भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (ICSSR) प्रायोजित


# विदर्भ अर्थशास्त्र परिषद


## ४३ वे वार्षिक अधिवेशन २०१९

### दि. २ व ३ फेब्रुवारी २०१९

# अर्थवेध

(स्मरणिका)





बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला रोड, नागपूर द्वारा संचालित

## भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Accredited with Grade B (CGPA 2.54) by NAAC Bengaluru

मुख्य संपादक

डॉ. सुनिल शिंदे

# अणुक्रमणिका

## प्रथम सत्र : भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा


१. भारतातील जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. जे.व्ही. गायकवाड ........ १५
२. जागतिकीकरण आणि भारत — डॉ. अर्चना बी. जैन ........ १८
३. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. नागोराव के. सोरे, कु. पायल विनोद भोयर ........ २२
४. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा : भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात — डॉ. सिद्धार्थ सुखदेव मेश्राम ........ २६
५. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा : जागतिकीकरणानंतर कृषीक्षेत्रातील यशापयश — प्रा. दिलीप पांडुरंग महाजन, डॉ. राजेंद्र रामराव गव्हाळे ........ ३२
६. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — डॉ. (सौ.) मंजुषा राजेंद्र ठाकरे ........ ३६
७. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — सुनिल प्रभाकर घुगल ........ ४०
८. जागतिकीकरण - भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हान — डॉ. दिपक को. शृंगारे, प्रा. निलेश म. मोहकार ........ ४५
८. जागतिकीकरणाच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील उपलब्धी व मर्यादा — डॉ. विजय वनकर, डॉ. श्रीकृष्ण बोढे ........ ४९
१०. जागतिकीकरण आणि भांडवलशाही — डॉ. शमापरवीन सरफराज खान ........ ५२
११. जागतिकीकरणाचे बदलते स्वरूप व आवश्यकता — डॉ. संजय धनवटे ........ ५३
१२. जागतिकीकरण व भांडवल प्रवाहाचा परिणाम — संतोष मोहदरे ........ ५७
१३. जागतिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था — डॉ.जे.एम. काकडे, प्रा. रविंद्र बा. शेंडे ........ ६१
१४. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम — डॉ. करमसिंग राजपूत ........ ६४
१५. जागतिकीकरण-शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व आत्महत्या — डॉ. ममता राममिलन साहु ........ ६८
१६. जागतिकीकरण आणि भारतीय शेतीचे अपयश — प्रा. डॉ. प्रतिभा एस. काळमेघ ........ ७०
१७. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने ........ ७३
१८. जागतिकीकरणात कृषी क्षेत्राचा विकास व सद्यस्थिती — प्रा. डॉ. संजय. जे. कोठारी ........ ७९
१९ जागतिकीकरणाच्या प्रकिया — डॉ. अजय नानाजी सरटकर, रेणू ए. तिवारी ........ ८३
२०. जागतिकीकरणाचे आर्थिक व सामाजिक पैलू — प्रा. डॉ. जे. एस. हटवार ........ ८४
२१. जागतिकरण आणि ग्रामीण अर्थ व राजकारण — डॉ. राजेश संतोषराव बहुरुपी ........ ८६
२२. जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर होणारे परिणाम — प्रा. राधेश्याम मानकर, प्रा. सुनिता निठोरी रविदास ........ ८९


## द्वितीय सत्र : सार्वजनिक क्षेत्राची यथार्थता


२३. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील यथार्थता — प्रा. डॉ. चुन्नीलाल प. साखरवाडे ........ ९१
२४. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे बुडीत कर्जाचे वाढते प्रमाण व विलिनीकरण — डॉ. सु.रा. जगताप ........ ९३
२५. सार्वजनिक क्षेत्रातील बँकेतील अनुत्पादक मालमत्ता एक समस्या — प्रा. एन.ए. पिस्तुलकर, प्रा. यु.डी. चव्हाण ........ ९७
२६. भारताच्या आधारभूत विकासात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका — डॉ. ईश्वर जनार्धन वाघ ........ १००
२७. भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राचे योगदान — सुभाष ज्ञा. गोटफोडे ........ १०४


Scanned with OKEN Scanner

# जागतिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

❑ डॉ.जे.एम. काकडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
❑ प्रा. रविंद्र बा. शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

भारत हा खेड्यांचा शांतताप्रिय देश आहे. इंग्रज साम्राज्याअगोदर भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था साधी, सुदृढ आणि संतुलित होती. इंग्रजांनी भारतीय अर्थव्यवस्थेला तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला जाणूनबुजून विस्कळीत केली. हा विस्कळीतपणाचा भाग दुरूस्त करण्यासाठी कधीही न वापरलेल्या युक्त्या महापुरुषांनी वापरून भारताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले आहे.

स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकास करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा आधार घेण्यात आला आहे. स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकास सुरू असतांना काही अनुकूल तर काही प्रतिकूल घटना घडलेल्या पहायला मिळते. अनुकूल घटनांमध्ये अ) १९६६-६७ मध्ये झालेला हरितक्रांतीचा प्रयोग आणि त्यामुळे आलेली अन्नधान्यातील स्वयंपूर्णता ब) १९६९ तसेच १९८० मध्ये झालेला राष्ट्रीयीकरणाचा भाग, अनुक्रमे १४ व ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला तसेच सर्वसामान्य ग्रामस्थांना, नागरिकांना वित्तीय समावेशनाचे सर्व फायदे सदैव मिळण्यासाठी हा राष्ट्रीयीकरणाचा प्रयोग आजही उत्सवशील असाच आहे. प्रतिकुल घटनेमध्ये १) १९९० मध्ये भारत आर्थिक संकटात सापडला. या आर्थिक संकटाचे वर्णन बरेचदा पुढीलप्रमाणे करण्यात येते. हत्तीने आपले समोरचे दोनही पाय वरती केल्यानंतर हत्तीच्या अगदी मागे असलेल्या व्यक्तीची जी गत होते. तशीच गत भारतीय अर्थव्यवस्थेची झालेली पहायला मिळते.

अनुकूल घटनांच्या भागापेक्षा प्रतिकुल परिणामांचे वर्चस्व फार झाले होते. १९९० मधील आर्थिक संकंट दूर करण्यासाठी "खाउजा" धोरणाचा वापर करण्यात आला. 'खा' म्हणजे खाजगीकरण (सरकारी मालकीहक्क कमी करणे) 'उ' म्हणजे उदारीकरण (विकासाला बाधक ठरणारे कायदे व नियम नष्ट करणे) 'जा' म्हणजे जागतिकीकरण (आर्थिक संबंध देषादेषातील ठेवून बाजारपेठांच्या विस्तृतीकरणाच्या माध्यमातून प्रत्येक घटकांबाबत परावलबीत्व स्विकारणे होय) आज या खाउजा' धोरणाला साधारणतः २८ वर्षे (२०१८) पूर्ण झालेली आहे. या 'खाउजा' धोरणाला समर्थन देणारा गट स्पष्टपणे सांगतो आहे की, भारताचा जेवढा विकास १९४७ ते १९९० या ४२ वर्षाच्या कालखंडात झाला नाही. तेवढा विकास १९९० ते २०१८ या साधारणतः २८ वर्षाच्या कालखंडात झाला आहे. 'खाउजा' धोरणाला समर्थन देणाऱ्या समर्थकांचा विकास तपासून पहाल तर दिसून येते की, झालेला विकास वास्तविक विकास किंवा सर्वसमावेशक विकास नसून कृत्रिम विकास आहे. सर्वसामान्य व्यक्ती आर्थिक विकासापासून बराच दूर असलेला दिसून येते. या धोरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विविध वैशिष्ट्यांवर आघात झालेला दिसून येतो. झालेला आघात दूर करण्यासाठी आपल्या देशाचे हित कशात आहे यांची जाण देशातील सत्तेवर असणाऱ्या गटापासून ते सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात लवकर तसेच सदैव असणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती :**

संशोधन पध्दतीतील प्रत्येक घटकांचा क्रम मागेपुढे असला तरी अचूक निष्कर्ष काढण्यासाठी सर्व घटकांचे योगदान सारखे महत्वाचे आहे. दुय्यम सामुग्रीचा आधार घेवून विषयाचे विश्लेषण करण्यात आले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था संतुलित करण्यासाठी विविध युक्त्याही निष्कर्षातून सुचलेल्या आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) जागतिकीकरण, उदारिकरण आणि खाजगीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविध वैशिष्ट्यांवर आघात झाला आहे. याचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण अर्थव्यवस्था शाश्वत व सर्वसमावेशक विकासाचा पाया आहे. याचा अभ्यास करणे.

३) 'खाउजा' धोरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील प्रतिकुल परिणाम नष्ट करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहीते :**

१) इंग्रज साम्राज्याअगोदर भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था समृध्द व संतुलित होती नंतर ती विस्कळीत झाली असून आजही असंतुलित आहे.

२) अडाण्यातील अडाणी व्यक्तीला तसेच हुशारातील हुशार व्यक्तीला सामावून घेण्याची क्षमता ग्रामीण अर्थव्यवस्थेत आहे.

**विषयाचे विश्लेषण :**

१) **जागतिकीकरणाद्वारे** ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविध

ISBN 978-81-935528-5-8



Scanned with OKEN Scanner

वैशिष्ट्यांवरील आघात.

स्वातंत्र्यानंतर आधुनिक रणसंग्रामाला सुरवात झाली आहे. परंतु या रणसंग्रामात कमकुवत राष्ट्रासारखी भूमिका अजूनही भारताची आहे. विविध प्रश्नांना तोंड देत असतांना भारत १९९० मध्ये आर्थिक संकटात सापडला. हे आर्थिक संकट दूर करण्यासाठी 'खाउजा' धोरणाचा वापर होवून आज २८ वर्षे जवळपास पूर्ण झाले आहे. या धोरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविध वैशिष्ट्यांवर आघात झालेला दिसून येते. प्रातिनिधीक आघातांचा भाग पुढीलप्रमाणे -

अ) ग्राहकाने तांदळासाठी दिलेल्या १ रूपयापैकी जेमतेम ५५ पैसे शेतकऱ्यांना पोहचत आहे. ब) शेतकऱ्यांनी शेतमाल विकल्यानंतर हमाली, भाडे इ. खर्च केल्यानंतर कुठलाही मोबदला शिल्लक न राहता शेतकऱ्यांनाच काही रक्कम द्यावी लागते. क) जी. डी. पी मध्ये शेती क्षेत्राचा वाटा उत्तोरोत्तर घटत जात आहे. (२०१७-१८ नुसार १४ टक्के) ड) नैसर्गिक साधनसंपत्तीचे व दुर्बल वर्गांचे शोषण मोठ्या प्रमाणावर होत आहे. जमिनीची सुपीकता कमी-कमी होत आहे. वस्तूच्या दर्जात घट होत आहे. संधीची असमान वाटणी व न्यायाचा अभाव निर्माण होत आहे. इ) प्रदर्शन प्रभावामुळे ग्रामीण जीवन ग्रामस्थांना कोंडवाळ्यासारखे वाटत आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविध वैशिष्ट्यांवर आघात होत असून हा आघात असाच सुरू राहिल्यास भारताचे आर्थिक, सांस्कृतिक, नैतिक, राजकीय व इतर स्वातंत्र्य धोक्यात जाणारे असल्यामुळे विविध युक्त्या तसेच संधी शोधून सावध होणे आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था वाचलीच पाहिजे, ती जगलीच पाहिजे असा सकंल्प आज आवश्यक आहे.

**२) जागतिकीकरणातील प्रवेशमुक्त व गमन अशक्य :**

जागतिकीकरणाच्या अनेक मर्यादाचा सुरवातीपासून भारतीय तसेच गरीब अर्थव्यवस्थांना त्रास होत आहे. विकसीत देशात शेतकऱ्यांना उंच अनुदाने मिळत आहे आणि भारतासारखा गरीब राष्ट्रातील शेतकऱ्यांना खुजी अनुदाने मिळत आहे. यामुळे असमान स्पर्धा निर्माण होऊन न्यायाचा अभाव आपोआपच निर्माण झालेला पाहायला मिळतो. अमेरिकेच्या न्युयार्कमध्ये गुलामांना किमान निर्वाह पातळी टिकविण्यासाठी जो खर्च येतो त्या आधारावर वस्तूंच्या किमती ठरविल्या जात असत. आजही गरीब राष्ट्रांतील मजुरांच्या मजुरीच्या असाच विचार लक्षात घेऊन उत्पादन खर्च व किमती ठरविल्या जात असलेल्या दिसते. उंच अनुदाने विकसित देशात व अविकसीत देशात खुजी अनुदाने यामुळे असमान स्पर्धा नि होऊन तसेच गरीब राष्ट्रात प्रदर्शन प्रभाव अधिक प्रभाव होत असल्यामुळे जागतिकीकरणामध्ये प्रवेश चांगला अ तरी व्यापार अटी अल्पकाळ व दिर्घकाळ गरीब राष्ट्रांना देण्याऱ्या आहे. 'मांजराच्या गळ्यात उंदारांनी घंटी बांधा अषी स्थीती विकसनशील देशांची झाली असल्या विकसनशील देशांनी जागतिकीकरणातून बाहेर पडण्याऐ सौदाशक्ती वाढवून विकसित देशाच्या कपटी नितीला देणे आवश्यक आहे. प्रवेश मुक्त व गमन अशक्य असल्या थांबुन वाद, प्रतिक्रीया आणि संवाद अशी कृती करणे आवश आहे.

**३) शेती, शेतकरी, शेतमजूर अशा विविध घटक योगदान व वास्तविकता :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विविध प्रश्न गहन व न सुट बनत आहे. शेतीचा उत्पादक कार्याकडून अनुत्पादक कार्यास वापर होत आहे. शेतकरी एकमेकांना विरूध्द गैरसमज वाढ जात आहे, त्याला माझ्या एवढे काहीच समजत नाही अ हीन भावना एकमेकांविरूध्द वाढत आहे. त्यामुळे शेतीत संरचनेचा प्रभाव निर्माण झालेला नाही. स्त्री श्रमिकांचा नि प्रक्रियेतील सहभाग नगण्य आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेत तरूण छूप्या बेरोजगारीत समाविष्ट असल्यामुळे दैनिक वर्तम पत्रातून त्यांना भेडसाविणारे प्रश्न पुढे आणित नाही, शेतक व शेतमजूर जगतातच किती त्यामुळे त्यांना आरोग्याच सोयी नाममात्र पुरविल्या जात आहे. मुलांच्या शिक्षणास मानवी भांडवल कमकुवत होणाऱ्या गोष्टीचा प्रभाव मो बनत आहे. इंग्रज सम्राज्याअगोदर ग्रामीण अर्थव्यवस्थेच संतुलितपणाला प्रोत्साहन देणारे घटक प्रदर्शन प्रभावामुळे न होत आहे. विदेशी वस्तुबाबत तरूण वर्गांचे आकर्षण कमी होता ते वाढत आहे. विपणन व्यवस्थेत ई - नामसारखे प्रये फसवे ठरत जात आहे, नैसर्गिक अनुकूलता तर भांडव अभाव आणि भांडवल पर्याप्त तर नैसर्गिक अनुकूलता अभ अशा दुष्टचक्रातून शेतकरी आपल्या अंतिम कार्यक्षमते वापर करीत नाही.

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटकात नफा प्रेरीत तत्वां अभाव असल्यामुळे सरकारच्या व लोकांच्या उदासीनतेमु वेगवेगळी बंधने निर्माण झाली आहे. सदाकाळ क्रांतीसार प्रयोग अंमलबजावणीत आल्यास समृध्द व संतुलित ग्रामी अर्थव्यवस्थेचा वारसा पुढील पिढ्यांना देता येईल, यासा जागतिकीकरणाच्या मर्यादा ओळखून अर्थव्यवस्थेतील प्रत्ये

ISBN 978-81-935528-5-8

साधनधनाचा पर्याप्त वापर होणे आवश्यक आहे.

४) ग्रामीण अर्थव्यवस्थेची विविध वैशिष्ट्ये

१) शेती हा कुटुंबाचा मोठा आधार

२) शेतीच्या साहाय्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधीची उपलब्धता.

३) उत्पादनात जमीन, हवा, पाऊस इ. घटकांचा म्हणजेच निर्सगाचा मोठा सहभाग.

४) दारिद्र्य, बेकारी, गरिबी, निरक्षरता इत्यादीचे मोठे प्रमाण.

५) सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादी परंपरेचे जतन करणारी व्यवस्था.

६) हस्तोद्योग व कुटीरउद्योग इत्यादी स्वरूपात अंगभूत वंशपरंपरागत काही कलाकुसरीचे चिराजिवीत्व जपणारी व्यवस्था.

७) आधुनिक संस्थात्मक घटकापासून वंचित मानवता व परस्पर सहकार्याने संघटीत समाज व्यवस्था.

या विविध वैशिष्ट्यातील नकारात्मक वैशिष्ट्यांचे रूपांतरण सकारात्मक वैशिष्ट्यांमध्ये करून सकारात्मक वैशिष्ट्ये अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. कारण आपल्या समाजाची मुळे ग्रामीण भागात रूजली आहे.

**५) ग्रामीण अर्थव्यवस्था :** 'रोज सोन्याची अंडी देणारी कोंबडी'.

ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणजे रोज सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. रोज सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीची जी कथा आपल्या वाचण्यात गेली आहे तशीच गत ग्रामीण अर्थव्यवस्थेची झालेली पहायला मिळते. रोज सोन्याच्या अंडीची प्रतिक्षा करण्याऐवजी जो पालन करणारा असतो तो कोंबडीच कापून अंडी काढतो आहे असा प्रयत्न देशात, देशांतील श्रीमंत तसेच श्रीमंत राष्ट्रांतील हस्तक्षेपाद्वारे गरिब राष्ट्रात पहायला मिळत आहे. त्याला प्रदर्शन प्रभावाचा खरा आधार आहे.

रोज सोन्याची अंडी देणारी कोंबडी ग्रामीण अर्थव्यवस्था असल्यामुळे सकारात्मक वापर अपेक्षीत आहे. लहाणपणापासून वार्धक्यापर्यंत आनंद देणाऱ्या गोष्टी ग्रामीण अर्थव्यवस्थेत असल्यामुळे ती वाचलीच पाहिजे, ती जगलीच पाहिजे, ती संतुलीत बनली पाहिजे असा संकल्प करणे आवश्यक झाले आहे. वापर सकारात्मक झाल्यास वर्तमान तसेच भविष्यकालीन पिढ्यांचा सार्थक उपभोग प्रेरीत बनणारा आहे. त्यामुळे शाश्वत व सर्वसमावेशक विकास निर्माण होण्यास कुठल्याही अडचणी नाही.

**समारोप :**

'कौशल्य असेल तर कौतुक होईल,' 'ज्यांचे युक्त्या त्याला पेटंट देणे आवश्यक,' इत्यादी गोष्टींचा आधार घेवून जागतिकीकरणाच्या मर्यादा तोडणे आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणजे रोज सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. या व्यूहरचनेतून तिचा वापर झाला पाहिजे त्यामुळे उद्योग व सेवा क्षेत्राला वास्तविक प्रेरणा मिळणारी आहे व या दोनही क्षेत्राच्या विकासातून शेतीला शाश्वत सर्वसमावेशक व अचूकतेचा विकास मिळविता येते.

शेतकऱ्यांचे कष्ट, निरंतर तळागाळातील व्यक्तीला शाश्वत व सर्वसमावेशकतेचा परिघ देणाऱ्या विविध संधी ग्रामीण अर्थव्यवस्थेत असल्यामुळे ती संतुलीत बनण्याकरीता ती जगलीच पाहिजे, वाचलीच पाहिजे अशी मनोभूमिका प्रत्येक राष्ट्रांतील नागरीकांची बनने आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. खांदेवाले श्रीनिवास, "जागतिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था" विशेष व्याख्यान, लोकमान्य महाविद्यालय वरोरा, डिसेंबर २०१८

२. देशपांडे श्रीधर व देशपांडे विनायक, भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण व विकास) हिमालया पब्लिकेशन, नागपूर.

३. कविमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर

४. मराठी अर्थशास्त्र परिषद, ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन, विविध चर्चासत्रे, चंद्रपूर २०१८

५. कराळे व कविमंडन, ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोण, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.

६. दैनिक वर्तमानपत्रे, (लोकसत्ता, लोकमत, सकाळ, देशोन्नती)


☆☆☆



Scanned with OKEN Scanner